# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र. कोविमं/ मुक्त विद्या./१० परीक्षा 2343
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक - २३.११.२०२२

प्रति,
केंद्रशाळाप्रमुख /मुख्याध्यापक
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,
सर्व संपर्क केंद्रशाळा
सातारा / कोल्हापूर.

विषय :-महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी नव्याने प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबत.
संदर्भ :- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं./६३५१/दिनांक २२.११.२०२२

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये इयता ५ वी व इयता ८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या व मे-जून २०२३ मध्ये होणा-या मुल्यमापन सत्रासाठी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी प्रवेश अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०८/११/२०२२ पासून दिनांक २१/११/२०२२ ( रात्री ११:५९ वाजेपर्यंत ) या कालावधी निश्चित करण्यात आला होता.सदरचा कालावधी संतुष्टात येत आहे.

उपरोक्त ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज भरण्यास व कागदपत्रे स्विकारण्यास मुदतवाढ देण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र . | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठीचा दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | मंगळवार दिनांक २२/११/२०२२ ते बुधवार दिनांक ३०/११/२०२२ ( रात्री ११.५९ वा. पर्यंत) | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी अर्ज भरणे. |
| २ | गुरुवार दिनांक २४/११/२०२२ ते शुक्रवार दिनांक ०२/१२/२०२२ | विद्यार्थ्यांनी मुळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करणे. |
| ३ | सोमवार दिनांक ०५/१२/२०२२ | संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

तरी उपरोक्त तक्त्यात नमूद कालावधीमध्ये संपर्क केंद्रसमन्वयक/मुख्याध्यापक यांनी योग्य कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

( डी.एस. पोवार )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहितीसाठी :-
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११००४